56/5/12

**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य**
**मुंबई यांचे कार्यालय**

धर्मादाय आयुक्त भवन,
३ रा मजला, ८३ डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८
दूरध्वनी क्र २४९३५४३४, २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

Office of the
CHARITY COMMISSIONER
3 rd Floor, 83, Dr. Annie Besant Rd,
Worli, Mumbai 400 018
Tel No. 24935434, 24935490 Fax No 24976420
E-mail ID cc-mahastate@mahacharity.gov.in
Webside – mahacharity.gov.in

15 SEP 2012

**परिपत्रक क्रमांक 346 दिनांक 18/०९/२०१२**

मुंबई सार्वजनिक प्रशासन व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३३(२) च्या अनुषंगाने अधिकृत लेखा परिक्षक पदी नविन नियुक्ती देताना आवश्यक पात्रता/अटी किंवा फेर नियुक्ती देतांना कोण-कोणती कागदात्र त्यासोबत जोडावीत व कोणत्या मार्गाने अर्ज मुख्यालयास सादर करावा याबाबत सोबत यादी व दिनांक ४ मे १९५३ च्या आदेशाची प्रत जोडण्यात येत आहे. विभागीय कार्यालयांनी त्यांच्या स्तरावर कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्यात यावी. आपले कार्यालयाचे अभिप्रायासह अर्ज पुढील कार्यवाही करीता मुख्यालयात पाठविण्यात यावेत. पूर्तता करु न शकणारे अर्ज मुख्यालयास सादर करु नयेत.

असे निदर्शनास आले आहे की, अधिकृत लेखा परिक्षक म्हणून फेर नियुक्तीसाठी अर्ज करताना संबंधित लेखा परिक्षक यांनी त्यांच्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये ज्या न्यासांचे लेखा परिक्षण केले असेल त्या न्यासांची यादी जोडणे अनिवार्य असते व ती यादी संबंधित स.ध.आ. / ध.स.आ., सा.न्या.नों. कार्यालय यांचे कडून प्रमाणित करुन या कार्यालयास पाठविणे बंधनकारक आहे, परंतु सदर यादी संबंधित कार्यालयाकडून साक्षांकित करुन अभिप्रायासह मुख्यालयास पाठविण्यात येत नाही. त्यामुळे अधिकृत लेखा परिक्षक यांनी जोडलेल्या यादीतील न्यासांचे लेखा परिक्षण केले आहे किंवा नाही याचा बोध होत नाही. तरी संबंधित सा.न्या.नों. कार्यालयाने अधिकृत लेखा परिक्षक यांनी फेर नियुक्तीच्या अर्जाबरोबर जोडलेल्या यादीची सत्यता पडताळून तसे प्रमाणित करुन दिल्यास त्यांना फेर नियुक्ती देणे सुलभ होईल. तरी यापुढे अधिकृत लेखा परिक्षक यांनी सादर केलेल्या अर्जाबरोबर असलेल्या यादीची सत्यता पडताळूनच आपले अभिप्रायासह अर्ज मुख्यालयात पाठवावा.

तसेच असेही निदर्शनास आले आहे की, काही अधिकृत लेखा परिक्षकांचा नविन नियुक्तीचा / फेर नियुक्तीचा कालावधी संपुष्टात येवूनही लेखे आपल्या कार्यालयात सादर करतात. तरी संबंधित कार्यालयाने त्यांचा नियुक्तीचा कालावधी तपासून व त्यांनी सादर केलेल्या लेख्यांबरोबर त्यांच्या आदेशाची छायांकित प्रत जोडूनच लेखे स्विकारण्यात यावेत.

तसेच सन् १९९९ पासून मा. धर्मादाय आयुक्त यांनी स्वतःच्या अधिकारात अधिकृत लेखा परिक्षक यांचा कालावधी तीन वर्षां करीता मर्यादित केलेला आहे. त्यानुसार सन् १९९९ अगोदर अधिकृत लेखा परिक्षक यांना दिलेले कायमस्वरुपी आदेश संपुष्टात येऊन अशा कायमस्वरूपी नियुक्त सर्व अधिकृत लेखा परिक्षकांनी फेरनियुक्तीसंबंधी आदेश प्राप्त करून घेणे आवश्यक होते. अद्यापही ज्या कायमस्वरूपी नियुक्त अधिकृत लेखा परिक्षकांनी फेरनियुक्तीचे आदेश प्राप्त करून घेतलेले नाहीत अशा अधिकृत लेखा परिक्षकांना ते ज्या कार्यालयामध्ये लेखे प्रमाणित करून सादर करतात त्या सर्व विभागीय कार्यालय प्रमुखानी दि ३१/१२/२०१२ पूर्वी त्यांच्या फेरनियुक्तीचे आदेश मंजूर करून घेण्याबाबत त्वरीत कळवावे व त्यानंतर जे अधिकृत लेखा परिक्षक फेरनियुक्तीचे आदेश प्राप्त करून घेणार नाहीत अशा अधिकृत लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले लेखे स्विकारू नयेत.

(वि.का.जाधव)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सर्व धर्मादाय सह आयक्त व सर्व सहायक धर्मादाय आयक्त

# अधिकृत लेखा परिक्षक म्हणून नविन नियुक्तीसाठी आवश्यक कागदपत्रे

**(मुंबई सार्वजनिक प्रशासन व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३३(२) च्या अनुषंगाने अधिकृत लेखा परिक्षक पदी नविन नियुक्ती देताना आवश्यक पात्रता/अटी नमुद असलेल्या दिनांक ४ मे १९५३ च्या शासन आदेशाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.)**

१) अर्ज स्वच्छ प्रतीत दिनांक व स्वाक्षरीसह असावा.

२) अर्जावर आपला स्वःताचा फोटो व रु.१०/- चा न्यायालयीन शुल्क तीकिट (कोर्ट फी स्टँम्प) लावलेला असावा.

३) उमेदवाराचे कोणत्याही न्यासाशी अथवा विश्र्वस्तांशी संबंध वा हितसंबंध नसणे व न ठेवणेबाबत विहित नमुन्यात रु.१००/- किमतीच्या मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर) प्रतिज्ञापत्र नोटरी करुन अर्जा सोबत सादर करावे. (विहीत नमुना कार्यालयात उपलब्ध आहे.)

३) अर्जात निवासी जिल्हा व लगतचा जिल्हा अशा दोन जिल्हयांचा उल्लेख केलेला असावा.

४) पत्ता पुरावा जोडावा. (मागिल महिन्याचे विद्युत देयक, दुरध्वनी देयक, गॅस देयक, वाहन चालक परवाना, पासपोर्ट यापैकी एकाच्या प्रमाणीत छायांकित प्रती)

५) अर्जा सोबतच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती धर्मादाय सह आयुक्त/सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय, यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात.

६) अर्ज आपल्या जिल्हयाचे धर्मादाय सह आयुक्त/सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांचे अभिप्रायासह व मार्फत मुख्यालयास सादर व्हावा.

७) लेखा शास्त्र व लेखा परिक्षण शास्त्र हे विषय घेवून बी.कॉम. पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्राची व गुणपत्रिकाची प्रमाणीत छायांकित प्रती अर्जा सोबत जोडाव्यात. तसेच सदर पदवी प्राप्त केल्यानंतर सनदी लेखापालाकडे कमित कमी पाच वर्षे काम केल्याचे मुळ अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जा सोबत सादर करावे, त्यावर पाच वर्षे अनुभवाचा तारखेसह उल्लेख असावा.

८) जे अर्जदार बी.कॉम./एम.कॉम. पदवी परिक्षा व्यतिरीक्त अन्य पदवी/पदवीका उत्तीर्ण झाले असल्यास त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या सहकार व लेखा शास्त्रतील पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे (जी.डी.सी.ॲन्ड ए.) प्रमाणपत्राची व गुणपत्रिकाची प्रमाणीत छायांकित प्रत अर्जा सोबत जोडावी. तसेच सदर पदवी/पदवीका प्राप्त केल्यानंतर सनदी लेखापालाकडे कमित कमी पाच वर्षे काम केल्याचे मुळ अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जा सोबत सादर करावे, त्यावर पाच वर्षे अनुभवाचा तारखेसह उल्लेख असावा.

९) अर्जदार शासनाच्या सहकार विभागातून सेवानिवृत्त झाला असेल शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबाबत संबंधित विभाग प्रमुखाचे आदेशांची प्रमाणीत केलेली सत्यप्रत व लेखा परिक्षणाचा अनुभवाबाबत त्याच विभाग प्रमुखांनी दिलेले अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र. अनुभवाचे प्रमाणपत्रांत अनुभवाचा कालावधी तारीखवार नमूद केलेला असावा.

१०)ज्या ज्या प्रमाणपत्रंच्या प्रमाणित सत्य प्रती पाठवाव्यात असा अल्लेख केला आहे, ती ती प्रमाणपत्रे संबंधीत जिल्हयाच्या ठिकाणच्या धर्मादाय सह आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त मूळ प्रमाणपत्रे दाखवून प्रमाणित केलेल्या प्रती ग्राहय धरण्यांत येतील. अन्य प्राधिका-यांकडून प्रमाणित केलेल्या प्रमाणित प्रती विचारांत घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

कृ.मा.प.

# अधिकृत लेखा परिक्षक म्हणून फेर नियुक्तीसाठी आवश्यक कागदपत्रे

१) अर्ज स्वच्छ प्रतीत दिनांक व स्वाक्षरीसह असावा.
२) अर्जावर अर्जदाराचा सध्याचा फोटो तसेच सोबत दोन फोटो व रु.१०/- चा न्यायालयीन शुल्क तीकिट (कोर्ट फी स्टँम्प) लावलेला असावा.
३) अर्जात निवासी जिल्हा व लगतचा जिल्हा अशा दोन जिल्हयांचा उल्लेख केलेला असावा.
४) मागिल तीन वर्षात लेखा परिक्षण करुन दाखल केलेल्या न्यासांची यादी सोबत जोडावी. त्यात न्यासाचे नांव, पत्ता, नोंदणी क्रमांक, लेखा परिक्षण वर्ष नमूद करावे. तसेच जोडलेली न्यासांची यादी आपल्या जिल्हयाचे धर्मादाय सह आयुक्त/सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय यांच्या कडून प्रमाणीत करुन त्यांच्या अभिप्रायासह असावी.
५) पत्ता पुरावा जोडावा. (मागिल महिन्याचे विद्युत देयक, दुरध्वनी देयक, गॅस देयक, वाहन चालक परवाना, पासपोर्ट यापैकी एकाच्या छायांकित प्रमाणीत प्रती)
६) मुख्यालयाने दिलेले मुळ ओळखपत्र व मुळ आदेश मुदत संपल्यानंतर अर्जासोबत मुख्यालयात जमा करावे.
७) अर्ज आपल्या जिल्हयाचे धर्मादाय सह आयुक्त/सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांचे अभिप्रायासह व मार्फत मुख्यालयास सादर करावा.

(वि.का.जाधव)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.